MHPU250018832025

फौ. कि. अर्ज नं. ३५०/२०२५
सुविधा लोहोट वि. अभिषेक लोहोट

**<u>निशाणी क्र. २२ खालील आदेश</u>**
**<u>( पारीत दिनांक ११/०३/२०२६)</u>**

**०१.** हया अर्जाद्वारे अर्जदार हिने अर्जात दुरुस्ती करण्यास परवानगी मिळण्याची विनंती केलेली आहे. तिचे असे कथन आहे की, तिने अंतरिम पोटगी मिळण्यासाठी केलेला अर्ज दिनांक ०६.०१.२०२६ रोजी अंशतः मंजूर करण्यात आलेला आहे. मात्र त्यानंतर जाबदेणार हयाची कंपनीअंतर्गत लंडन येथे बदली झालेली आहे. त्यामुळे त्याच्या पगारामध्येही वाढ झालेली आहे. तसेच अर्जामध्ये जाबदेणार हयाच्या कुटुंबाची वारजे येथील ०१ सदनिका ही मिळकत अर्जात समाविष्ट करण्याचे राहुन गेलेले आहे. त्यामुळे अर्जामध्ये वरील दोन दुरुस्त्या करावयाच्या आहेत, त्यासाठी तिने हा अर्ज दाखल केलेला आहे.

**०२.** जाबदेणार हयाने निशाणी क्र. २६ वर त्याचे म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध केलेला आहे. त्याचे असे कथन आहे की, अर्जातील मजकूर चुकीचा आहे. अर्जदाराचा अंतरिम पोटगीचा अर्ज हयापुर्वीच मंजूर झालेला आहे. त्यामुळे आता अर्जात दुरुस्ती करण्याची आवश्यकता नाही. प्रस्तूतचा अर्ज हा केवळ मुळ अर्जात राहिलेल्या उणिवा भरुन काढण्यासाठी दिलेला आहे. दुरुस्ती मंजूर केल्यास जाबदेणार हयाच्यावर अन्याय होईल. तसेच मुळ अर्जाचे कामकाज सुध्दा लांबणीवर पडेल.

०३. अर्जदार हयांचे वकिल श्री सी. एस. डहाळे व जाबेदणार हयांचे वकिल श्री एस. एस. सातव हयांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

**०४.** प्रस्तूतचा खटला हा भारतीय नागरी सुरक्षा संहितेचे कलम १४४ प्रमाणे पोटगी मिळण्यासाठी दाखल करण्यात आलेला आहे. अर्जदार पोटगी मिळण्यास पात्र आहे किंवा कसे हे पुराव्याअंती ठरणार आहे. अर्जदार पोटगी मिळण्यास पात्र ठरल्यास पोटगीची रक्कम ठरवित असतांना जाबदेणार हयाचे उत्पन्न विचारात घ्यावे लागणार आहे. त्याच्या उत्पन्नानुसारच पोटगीची रक्कम ठरविली जाणार आहे. अर्जदारास अर्जामध्ये

जाबदेणार हयाच्या वाढलेल्या पगाराबाबत तसेच त्याच्या कुटुंबाच्या मिळतीबाबत दुरुस्ती करायची आहे. हया दोनही बाबी जाबदेणार हयाच्या उत्पन्नाशी संबंधीत आहेत. त्यामुळे जाबदेणार हयास आता नेमका किती पगार मिळतो व वारजे येथे सदनिकेमधून जाबदेणार हयास काही उत्पन्न मिळते किंवा कसे, हे सिध्द करण्याची संधी अर्जदारास देणे गरजेचे आहे. जाबदेणार हयास त्याची कैफियत देण्याचा तसेच अर्जदाराची उलटतपासणी घेण्याचा अधिकार आहेच. अश्या स्थीतीत दुरुस्ती अर्ज मंजूर केल्यास जाबदेणार हयाचे कोणतेही नुकसान होण्याची शक्यता नाही. त्यामुळे दुरुस्ती अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. अर्जदार ही जाबदेणार हयाची पत्नी असल्याने तिच्यावर हया अर्जाचा खर्च बसविण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

. अर्जदार हिने पुढील तारखेपर्यंत अर्जात दुरुस्ती करुन दुरुस्त अर्जाची प्रत दाखल करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by ANANT HIMMATRAO BAJAD
Date: 2026.03.11 17:38:11 +0530

जुन्नर
दिनांक –११/०३/२०२६

(अनंत हिम्मतराव बाजड)
२रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर., जुन्नर